मराठी
# न्यूज एक्सप्रेस
मराठी माध्यम क्षेत्रातील आघाडीचे न्यूज पोर्टल

बातमी व जाहीराती साठी संपर्क साधा!
: ९८३४१३८४८२



# राज्यात महापालिका निवडणुकांची लगबग

## मिशन महानगरपालिका: डिसेंबरमध्ये मतदान, जानेवारीत नवे महापौर पदस्थापना होणार!

**पिंपरी | प्रतिनिधी**

राज्यातील 29 महापालिकांच्या निवडणुकांचा मार्ग मोकळा झाला असून प्रारुप प्रभाग रचना राज्य सरकारने अंतिम करून निवडणूक आयोगाकडे सादर केली आहे. त्यामुळे राज्यभर महापालिकांच्या निवडणुकांची प्रक्रिया प्रत्यक्षात सुरू होणार आहे.

2021 पासून रखडलेल्या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांसंदर्भात सर्वोच्च न्यायालयाने चार आठवड्यांत अधिसूचना काढून चार महिन्यांत निवडणुका घेण्याचे आदेश दिल्यानंतर राज्य सरकारने हालचालींना गती दिली. त्याअंतर्गत प्रारुप प्रभाग रचना तयार करून ती निवडणूक आयोगाकडे पाठवण्यात आली आहे.




**प्रारुप प्रभाग रचनेची पुढील प्रक्रिया:**

22 ते 25 ऑगस्टदरम्यान: प्रारुप प्रभाग रचना जाहीर करण्याचे वेळापत्रक

त्यानंतर 15 दिवस: नागरिकांकडून हरकती व सूचना मागवण्यात येणार.

नंतरच्या 10 दिवसांत: सुनावणीनंतर अंतिम प्रभाग रचना जाहीर केली जाईल.

त्यानंतर प्रभागांमध्ये आरक्षण सोडत प्रक्रिया पार पडेल.

निवडणूक कार्यक्रम जाहीर होईल.

### मतदान आणि निकाल:

- » 20 ते 25 डिसेंबर 2025: दरम्यान मतदान होण्याची शक्यता.
- » जानेवारी 2026: नव्या महापौरांची नियुक्ती अपेक्षित.

> निवडणूक प्रारुप प्रभाग रचना तयार करुन राज्य शासनाकडे मान्यतेसाठी पाठवली आहे. शासनाच्या वेळापत्रकाप्रमाणे दि. 22 ऑगस्टरोजी प्रभाग रचना प्रसिद्ध करण्याचे आदेश मिळाले की, शहरातील 8 क्षेत्रीय कार्यालय आणि मुख्यालय येथे प्रभाग प्रसिद्ध केले जाणार आहेत.
>
> **- अविनाश शिंदे, सहायक आयुक्त, निवडणूक विभाग.**

# शहरातील सर्व सार्वजनिक गणेश मंडळांना ऑनलाइन परवाना

## महापालिका व पिंपरी-चिंचवड पोलीस आयुक्तालयाच्या वतीने गणेश मंडळांना ऑनलाइन परवाना

**पिंपरी | प्रतिनिधी**

पिंपरी-चिंचवड महापालिका व पिंपरी-चिंचवड पोलीस आयुक्तालयाच्या वतीने शहरातील सर्व सार्वजनिक गणेश मंडळे, गृहनिर्माण संस्थांना गणेशोत्सवासाठी ऑनलाइन पद्धतीने परवानग्या देण्यास सुरुवात झाली. शहरातील, पोलीस आयुक्तालयाच्या क्षेत्रातील सार्वजनिक मंडळे ऑनलाइन पद्धतीने अर्ज करू शकतात. मंडळ व हाऊसिंग सोसायट्यांनी या सुविधेचा लाभ घ्यावा, असे आवाहन महापालिका, पोलिसांनी केले आहे.

मंडळातील सभासदाने स्वतःचे खाते महापालिकेच्या संकेतस्थळावर HTTP://WWW.PCMCINDIA.GOV.IN उपलब्ध असलेल्या गणेश उत्सव मंडप परवानगी २०२५ या लिंकवर तयार करणे आवश्यक आहे. खाते तयार करताना मोबाइल ओटीपीद्वारे खात्यावरील मोबाइल नंबरची नोंद घेतली जाईल. मंडळ महापालिकेच्या कार्यक्षेत्रातील आहे अथवा नाही हे नोंदवणे आवश्यक आहे. जेणेकरून आवश्यक कागदपत्रांची मागणी संगणक प्रणालीमार्फत केली जाऊ शकते. महापालिकेच्या 'अ', 'ब', 'क', 'ड', 'इ', 'फ', 'ग' व 'ह' क्षेत्रीय कार्यालयांतर्गत नोंदणी केली जाणार आहे. क्षेत्रीय कार्यालयातील स्थापत्य विभाग सर्वप्रथम ना-हरकत दाखला देईल. त्यानंतरच संगणक प्रणाली अंतिम दाखला मंडळांना ऑनलाइन पद्धतीने उपलब्ध करून देणार आहे.



महापालिकेकडून ना-हरकत दाखला मिळाल्यानंतरच पोलीस आयुक्त कार्यालयाची प्रक्रिया सुरू होणार आहे. ज्या अर्जांना महापालिका अंतिम ना-हरकत दाखला देते, तीच प्रकरणे पोलिसांकडे संगणक प्रणालीद्वारे पाठविली जाणार आहेत. पालिकेच्या ना-हरकत दाखल्यानंतर पोलिसांकडून संबंधित अर्ज ऑनलाइन पद्धतीने त्या त्या पोलीस ठाण्याच्या अंतर्गत असलेल्या वाहतूक विभागाकडे वर्ग केला जाणार आहे. वाहतूक विभागाच्या ना-हरकत दाखल्यानंतर पोलीस कार्यालयाकडील अंतिम परवानगी मंडळास उपलब्ध होईल.

अर्ज करताना मंडळाने अध्यक्ष, सचिव, खजिनदार यांचे छायाचित्र, मोबाइल क्रमांक तसेच देखाव्यासाठी वापरल्या जाणाऱ्या विविध सुविधांची माहिती संगणक प्रणालीमध्ये पुरविणे आवश्यक आहे. गणेश स्थापना तसेच गणेश विसर्जन मिरवणूक यांच्या मार्गाची नोंद करणे तसेच त्यामध्ये वापरली जाणाऱ्या वाहनांची संख्या, देखावा, विद्युत रोषणाई इत्यादींची माहिती देखील नोंदविणे क्रमप्राप्त आहे. महापालिकेच्या भूमी व जिंदगी विभागामार्फत देण्यात येणारी ही सुविधा सर्व सार्वजनिक गणेश मंडळास विनाशुल्क पद्धतीने उपलब्ध असणार आहे.

### महापालिका हद्दीबाहेरील मंडळांना परवाना मिळणार

» महापालिकेच्या हद्दीबाहेरील गणेश मंडळांना अर्ज करताना प्रथमतः तेथील नगरपरिषद, नगरपालिका, ग्रामपंचायतीकडील ना-हरकत दाखला मिळवणे आवश्यक आहे. पिंपरी-चिंचवड पोलीस आयुक्तालय हद्दीतील मंडळांना परवाना दिला जाणार आहे. देहू, आळंदी, देहूरोड कटक मंडळ, शिरगाव, परंदवाडी, तळेगाव आदी पोलीस ठाण्यांच्या अंतर्गत येणारा परिसर व त्या परिसरातील मंडळ या सेवेचा लाभ घेऊ शकतात.

# गोळीबार, हातगोळे, अश्रूधुर नळकांड्या फोडण्याचा सराव

## पोलिसांचा ‘मॉक ड्रिल’; मोर्चे, उत्सवांच्या पार्श्वभूमीवर जमावबंदी हाताळण्याची तयारी

**पिंपरी | प्रतिनिधी**

गणेशोत्सव काही दिवसांवर येऊन ठेपला आहे. याचबरोबर वेगवेगळ्या समाजाचे मोर्चे, आंदोलने आणि मोठ्या प्रमाणात होणारी गर्दी लक्षात घेऊन पिंपरी-चिंचवड पोलिसांनी गुरुवारी (दि. २१) सकाळी सांगवी येथील मोकळ्या मैदानात जमावबंदी हाताळण्याचा सराव (मॉक ड्रिल) केला. या सरावात गोळीबार, हातगोळे फेकणे, अश्रुधुर नळकांड्यांची चाचणी अशा सर्व उपाययोजना प्रत्यक्षात करून पाहण्यात आल्या.



हिंसक जमावाला काबू करत जमाव पांगवण्यासाठी पोलिसांकडून नेमके कोणते पाऊल उचलले जाईल, याचे सरावादरम्यान प्रात्यक्षिक दाखवण्यात आले. हवेत गोळीबार करून जमाव मागे हटविणे, अश्रुधुर नळकांड्या फोडून परिसर रिकामा करणे, तसेच हातगोळ्यांचा वापर करून जमाव विखुरण्याची प्रक्रिया यावेळी राबविण्यात आली. पोलीस पथकांनी विविध दिशांनी वेगाने तैनात होत जमावबंदी नियंत्रणाचे तंत्र पुन्हा एकदा तपासून पाहिले.

### सुरक्षेच्या दृष्टीने पाऊल

» **मागील काही महिन्यांत विविध मागण्यांसाठी राज्यभर निघालेल्या मोर्च्यांमुळे पोलिसांना मोठ्या प्रमाणात तणावपूर्ण परिस्थितीचा सामना करावा लागला होता. अशा घटनांचा अनुभव लक्षात घेऊन ही पूर्वतयारी करण्यात आल्याचे वरिष्ठ पोलिस अधिकाऱ्यांनी सांगितले.**

“ गणेशोत्सव आणि मोर्चे-आंदोलनांच्या पार्श्वभूमीवर पोलिसांनी सतर्क राहणे आवश्यक आहे. जमावबंदीच्या प्रसंगी पोलिसांनी कोणते तांत्रिक व कायदेशीर उपाय करावेत, याचा हा सराव आहे. नागरिकांची सुरक्षितता अबाधित ठेवत कायदा-सुव्यवस्था सुरळीत राखणे, हे यामागचा उद्देश आहे. अशा सरावामुळे प्रत्यक्ष परिस्थितीत पोलिसांचे काम अधिक सक्षमपणे पार पाडता येते.

**- सुनील कुराडे, सहायक आयुक्त, पिंपरी- चिंचवड.**

# “राष्ट्रीय अवकाश दिन” निमित्त सायन्स पार्क येथे विविध उपक्रम

## 23 ऑगस्ट रोजी व्याख्यान, मून वॉक, मेक अँड टेकसह विज्ञानप्रेमींसाठी खास कार्यक्रम

**पिंपरी | प्रतिनिधी**

पिंपरी- चिंचवड महापालिकेच्या सायन्स पार्क आणि तारामंडळ यांच्या संयुक्त विद्यमाने, सायन्स एज्युकेशन ट्रस्ट, इस्रो-एसपीपीयू एसटी आणि भारतीय विज्ञान शिक्षण व संशोधन संस्था (पुणे) यांच्या सहकार्याने २३ ऑगस्ट २०२५ रोजी ‘राष्ट्रीय अवकाश दिन’ साजरा करण्यात येणार आहे. यानिमित्त महापालिकेच्या सायन्स पार्क येथे विविध उपक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे.




राष्ट्रीय अवकाश दिनाची या वर्षीची थीम ‘आर्यभट्ट ते गगनयान – प्राचीन ज्ञान ते अनंत शक्यता’ अशी आहे. भारताच्या अवकाश संशोधन प्रवासाचा आणि त्याच्या उज्वल भविष्याचा आढावा यानिमित्ताने घेतला जाणार आहे. त्या अनुषंगानेच सायन्स पार्क येथे २३ ऑगस्ट २०२५ रोजी विविध उपक्रम होणार आहेत. यामध्ये सकाळी ११ ते सायंकाळी ५ या वेळेत भारतीय विज्ञान शिक्षण व संशोधन संस्था (पुणे) तर्फे विविध सत्रांचे आयोजन करण्यात आले आहे. नागरिकांना चंद्रावर चालण्याचा अनुभव मिळावा यासाठी ‘व्हर्च्युअल रिॲलिटी मून वॉक’ हा विशेष उपक्रम देखील आयोजित करण्यात आला आहे. तसेच ‘मेक अँड टेक’ उपक्रमांतर्गत सहभागी होऊन नागरिक अवकाशाशी निगडित मॉडेल्स तयार करू शकणार आहेत.

ज्येष्ठ इस्रो शास्त्रज्ञ ए. के. सिन्हा यांचे ‘इंडिया इन्टू स्पेस – इस्रो टुवर्ड्स नॅशनल प्रॉस्पेरिटी’ या विषयावरील व्याख्यान सकाळी ११:३० ते दुपारी १२:३० या वेळेत तारांगण सभागृहात होणार आहे. ए. के. सिन्हा यांनी ३६ वर्षे इस्रोमध्ये काम केले असून भारताच्या अंतराळ संशोधनात त्यांचा मोठा वाटा आहे. तरी जास्तीत जास्त विद्यार्थ्यांनी व नागरिकांनी या कार्यक्रमाचा लाभ घ्यावा, असे आवाहन महापालिकेच्या वतीने करण्यात येत आहे.

“ राष्ट्रीय अवकाश दिन हा आजच्या तरुण पिढीला विज्ञानाची प्रेरणा देणारा दिवस आहे. पिंपरी चिंचवड सायन्स पार्कने नेहमीच विज्ञानाचे महत्त्व नागरिकांपर्यंत पोहोचवण्याचे काम केले आहे. यंदा राष्ट्रीय अवकाश दिनानिमित्त ‘आर्यभट्ट ते गगनयान’ हा आपल्या देशाचा प्रवास विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचवण्यासाठी सायन्स पार्कमध्ये आयोजित केलेले उपक्रम नक्कीच उपयुक्त ठरतील. अशा उपक्रमातून विद्यार्थ्यांमध्ये विज्ञानाप्रती जिज्ञासा निर्माण होईल.

**- शेखर सिंह, आयुक्त तथा प्रशासक, पिंपरी चिंचवड महापालिका.**

“ पिंपरी चिंचवड सायन्स थीम पार्कला भेट देणाऱ्या नागरिकांसाठी अंतराळ समजून घेण्याची संधी राष्ट्रीय अवकाश दिनानिमित्त मिळणार आहे. या संधीचा लाभ घेऊन ते भारताच्या अंतरिक्ष प्रवासाच्या या ऐतिहासिक वाटचालीत सहभागी होऊ शकतात.

**- प्रविण तुपे, संचालक, सायन्स पार्क.**

“ ‘व्हर्च्युअल रिॲलिटी मून वॉक’, मॉडेल मेकिंगसारख्या अनुभवातून मुलांना आणि नागरिकांना विज्ञान शिकणे अधिक रंजक होईल. तसेच ए. के. सिन्हा यांसारख्या अनुभवी शास्त्रज्ञांचे मार्गदर्शन विद्यार्थ्यांना मोठी स्वप्ने पाहण्याची आणि भारताच्या अंतराळ संशोधनात योगदान देण्याची प्रेरणा मिळेल.

**- डॉ. श्रद्धा खांपरिया, मुख्य कार्यकारी अधिकारी, सायन्स पार्क**

# विद्यापीठ चौकातील उड्डाणपुलाचे लोकार्पण

## मुख्यमंत्र्यांच्या हस्ते उद्घाटन; आजपासून औंध ते शिवाजीनगर बाजूने करता येणार प्रवास

**पुणे | प्रतिनिधी**

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरणामार्फत औंध ते शिवाजीनगर दरम्यान उभारण्यात आलेल्या एकात्मिक दुमजली उड्डाणपुलाचे सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ चौक येथे बुधवारी (दि. २०) लोकार्पण करण्यात आले. लोकार्पणानंतर त्यांनी दुमजली उड्डाणपुलाच्या कामांची पाहणी केली.

यावेळी उपमुख्यमंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री अजित पवार, उच्च व तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांत दादा पाटील, आमदार सिद्धार्थ शिरोळे, बापुसाहेब पठारे, हेमंत रासणे, विभागीय आयुक्त डॉ. चंद्रकात पुलकुंडवार, पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाचे महानगर आयुक्त डॉ. योगेश म्हसे, अतिरिक्त महानगर आयुक्त दीपक सिंगला, पुणे महानगरपालिका आयुक्त नवल किशोर राम, पुणे शहरचे सह पोलीस आयुक्त रंजन कुमार शर्मा, जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे कुलगुरु डॉ. सुरेश गोसावी, मुख्य अभियंता रिनाज पठाण आदी उपस्थित होते.

महानगर आयुक्त डॉ. म्हसे यांनी सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ चौक येथील एकात्मिक दुमजली उड्डाणपूल (औंध ते शिवाजीनगर) प्रकल्पाबाबत माहिती दिली.



### कार्यक्रमापूर्वी रंगले घोषणायुद्ध

» उड्डाणपुलाच्या उद्घाटनापूर्वी येथे उभारलेल्या मंडपात जोरदार घोषणायुद्ध रंगले. राष्ट्रवादीच्या (अजित पवार) कार्यकर्त्यांनी अजित पवारांच्या नावाचा जोरदार जयघोष केला. हे पाहून भाजपच्या कार्यकर्त्यांनीही मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नावाने जोरदार घोषणाबाजी केली. श्रेय घेण्यासाठी ही घोषणाबाजी केल्याची चर्चा उपस्थितांत होती.

### एकात्मिक दुमजली उड्डाणपूल खर्च 277 कोटी

» पुणे विद्यापीठ चौकामध्ये तसेच गणेशखिंड रस्त्यावरील वाहतूक कोंडीच्या निराकरणासह दीर्घकालीन वाहतूक व्यवस्थापन सुनिश्चित करण्यासाठी सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ चौकात एकात्मिक दुमजली उड्डाणपुलाची उभारणी केली असून, यासाठी अंदाजित 277 कोटी रुपयांच्या अंदाजपत्रकास मान्यता प्राप्त आहे.

### पाषाणकडील बाजू ऑक्टोबर 2025 अखेरपर्यंत

» या उड्डाणपुलाची एक मार्गिका (औंध-शिवाजीनगर) वाहतुकीसाठी खुली करण्यात आली. शिवाजीनगर व औंध बाजूकडील रॅम्पचे बांधकाम पूर्ण झाले असून, उर्वरित बाणेर व पाषाण बाजूकडील रॅम्पचे बांधकाम ऑक्टोबर 2025 अखेरपर्यंत पूर्ण करण्याचे नियोजन पीएमआरडीएच्या माध्यमातून करण्यात येत आहे.

# वर्ष होऊनही एकतानगरीचे पुनर्वसन कागदावरच

## राज्य सरकारकडून कोणतेही आदेश न आल्यामुळे एकतानगरीचे पुनर्वसन कागदावरच

**पुणे | प्रतिनिधी**

खडकवासला धरणातून नदीपात्रात ३९ हजार क्युसेक्स पाणी सोडले आहे. त्यामुळे एकतानगरमधील सोसायट्यामध्ये पुन्हा पाणी शिरले आहे. त्यामुळे एकतानगरीच्या पुनर्वसनाचा प्रश्न ऐरणीवर आला आहे. गेल्या वर्षी सिंहगड रस्त्यावरील एकतानगरमध्ये निळ्या रेषेच्या आतील बांधकामांचे पुनर्वसन करण्याची घोषणा तत्कालीन मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी केली होती. त्यानुसार विठ्ठलवाडी (हिंगणे खुर्द) येथील नियोजित सिंहगड रस्ता पोलिस ठाण्याच्या मागच्या बाजूस महापालिकेच्या जागेवर पुनर्वसन करण्याचा प्रस्ताव राज्य शासनाकडे पाठवला आहे. पण राज्य सरकारकडून कोणतेही आदेश न आल्यामुळे वर्ष होऊनही एकतानगरीचे पुनर्वसन कागदावरच आहे.



पुणे शहर व खडकवासला धरण प्रकल्पाच्या पाणलोट क्षेत्रात झालेल्या मुसळधार पावसामुळे २५ जुलै २०२४ रोजी मुठा नदीला पूर आला. त्यामध्ये एकतानगर भागातील अनेक सोसायट्या, दुकानांमध्ये पाणी घुसले. त्यामध्ये कोट्यावधी रुपयांचे नुकसान झाले असून, या खर्चातून अद्याप नागरिक पूर्णपणे सावरलेले नाहीत. या घटनेनंतर तत्कालीन मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री अजित पवार, मनसेचे अध्यक्ष राज ठाकरे यांच्यासह राज्यातील अनेक नेत्यांनी या ठिकाणी भेटी दिल्या. या भेटीच्या वेळी एकनाथ शिंदे यांनी पुराचा धोका टाळण्यासाठी नागरिकांचे कायमस्वरूपी पुनर्वसनासाठी विशेष दर्जा देऊन क्लस्टर केले जाईल, असे सांगितले होते. त्यानंतर महापालिकेने या भागात केलेल्या सर्वेक्षणात निळ्या पूररेषेसह निळ्या लाल पूररेषेच्या आतमध्ये १०३ इमारती आढळून आल्या. त्यामध्ये १ हजार ३८३ सदनिका तर ६७ दुकानांचा समावेश आहे. या इमारतीचे निवासी क्षेत्रफळ हे ८७ हजार ३९९ चौरस मीटर असून, व्यापारी क्षेत्र १ हजार ३४० चौरसमीटर इतके आहे. बांधकाम नियमावलीनुसार दाट लोकवस्ती नसलेल्या भागात दोन हेक्टरपेक्षा जास्त भूखंडावर क्लस्टर करता येऊ शकते. ठाण्यात या पद्धतीने राज्य सरकारने क्लस्टर योजना राबविली, त्याच पद्धतीने एकतानगरीमध्ये आराखडा तयार केला जाणार आहे. या प्रकल्पासाठी सुमारे ६९८ कोटी रुपयांचा खर्च अपेक्षित आहे. एकतानगरीमध्ये निळ्या रेषेच्या आतील बांधकामांचे पुनर्वसन करण्याचा प्रस्ताव तत्कालीन महापालिका आयुक्त डॉ. राजेंद्र भोसले यांनी राज्य सरकारकडे पाठविला होता. पण त्यावर पुणे महापालिका प्रशासनाने सातत्याने पाठपुरावा केला होता. पण त्याबाबत राज्य सरकारकडून कोणतेही आदेश आले नाहीत.

### जागाही ठरली, पण पुढे काहीच झाले नाही

» एकतानगरीमधील पूररेषेच्या आतील बांधकामांचे पुनर्वसन करण्यासाठी मंत्रालयात पाठवला आहे. नियोजित सिंहगड रस्ता पोलिस ठाण्याच्या मागे महापालिकेची जागा आहे, तेथे हे पुनर्वसनासाठी जागा निश्चित केली आहे. पण राज्य सरकारकडून कोणताही प्रतिसाद मिळालेला नाही. त्यामुळे जागा निश्चित होऊनही पुढे काहीच झाले नाही.

# खडकवासलातून 39 हजार क्युसेक विसर्ग

## 35 तासांत टेमघर येथे विक्रमी 276 मिलिमीटर पाऊस; खडकवासला साखळीत 98.32 टक्के साठा

**पुणे | प्रतिनिधी**

रायगड जिल्ह्याच्या हद्दीवरील घाटमाथ्यासह पानशेत - वरसगाव धरणखोऱ्यात मुसळधार पाऊस पडत आहे. त्यामुळे बुधवारी (दि. 20) सकाळी खडकवासला धरणातून मुठा नदीत सोडण्यात येणाऱ्या विसर्गात 39 हजार 138 क्युसेकपर्यंत वाढ केली आहे. दरम्यान, बुधवारपर्यंत खडकवासला धरणसाखळीत 28.66 टीएमसी म्हणजे 98.32 टक्के साठा झाला होता.

खडकवासला परिसरात पावसाचा जोर ओसरला असला तरी घाटमाथ्यावर मुसळधार सुरू आहे. टेमघर येथे मंगळवारी (दि. 19) सकाळी सहा ते बुधवारी सायंकाळी पाच या 35 तासांत विक्रमी 276 मिलिमीटर पाऊस पडला. तर याच कालावधीत पानशेत येथे 182, वरसगाव येथे 195 व खडकवासला येथे 88 मिलिमीटर पाऊस झाला आहे.



या पावसामुळे मोसे, आंबी, मुठा नद्यांसह ओढे-नाले दुथडी भरून वाहत आहेत. त्यामुळे पानशेतमधून 10 हजार 112, तर वरसगावमधून 10 हजार 105 तर टेमघर धरणातून 3 हजार 122 क्युसेकने पाणी सोडले जात आहे. त्यामुळे खडकवासलातून मुठा नदीत मोठ्या प्रमाणात पाणी सोडले जात आहे. तरीही धरणाची पातळी 99.16 म्हणजे सुमारे शंभर टक्क्यावर आहे.

### 2 टीएमसी पाणी सोडले

» खडकवासला धरणातून मंगळवारी सकाळपासून बुधवारी सायंकाळी पाच वाजेपर्यंत मुठा नदीपात्रात तब्बल 2 टीएमसी जादा पाणी सोडले आहे. यंदाच्या पावसाळ्यात आजपर्यंत मुठा नदीत 14.81 टीएमसी पाणी सोडले आहे.

“ खडकवासला धरणक्षेत्रात पावसाचा जोर कमी झाला आहे, मात्र पानशेत खोऱ्यातील घाटमाथ्यावर पावसाचे प्रमाण अधिक आहे. त्यामुळे वरील तिन्ही धरणांतून सोडलेल्या पाण्याची भर खडकवासलात पडत आहे. त्यामुळे खडकवासलातून जादा पाणी सोडले जात आहे. पानशेत खोऱ्यात दुपारपासून पावसाचा जोर थोडा कमी झाला आहे. आता जोरदार पाऊस पडला नाही, तर खडकवासलाचा विसर्ग कमी करण्यात येणार आहे.

**- मोहन भदाणे, उपविभागीय अभियंता, जलसंपदा विभाग, खडकवासला**

---

# मांजरीतील 154 एकर जमीन ‘जलसंपदा’च्या ताब्यात

## महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळाचे पुणे विभागाच्या मुख्य अभियंत्यांना निर्देश

**पुणे | प्रतिनिधी**

जलसंपदा विभागाने मांजरीतील सुभाष सामुदायिक सहकारी शेतकरी संघाला दिलेली 154 एकर जमीन अखेर ताब्यात घेतली आहे. महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळाने याबाबत पुणे विभागाच्या मुख्य अभियंत्यांना निर्देश दिले आहेत. तसेच, गेल्या 10 वर्षांत संघाने जमिनीचा वापर केल्याने रेडीरेकनर आणि रेपो दराने महसूल विभागाच्या नियमांनुसार भाडेपट्ट्याची रक्कम वसूल करावी, असेही सुचविण्यात आले आहे.

मांजरीतील सुभाष सामुदायिक सहकारी शेतकरी संघ मर्यादित या संस्थेच्या सदस्यांनी खासगी बांधकाम व्यावसायिकाला बेकायदा जमिनीचा ताबा दिल्यावरून वाद पेटला आहे. मांजरीतील सर्व्हे क्र. 180, 181, 182,183 व 184 मधील सुमारे 243 एकर जमीन जलसंपदा विभागाकडून ड्रेनेजकरीता संपादित केली होती. त्यानंतर 1948 ते 2015 या कालावधीत ही जमीन मे. सुभाष सामुदायिक सहकारी शेतकरी संस्था व वसंतदादा शुगर इन्स्टिट्यूट यांना भाडेपट्टा कराराने देण्यात आली.

हा भाडेपट्टा करार हा 2015 मध्ये संपुष्टात आला. महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळाच्या 2014 मध्ये नियामक मंडळाच्या 106 व्या बैठकीतील मंजूर ठरावामध्ये सर्व्हे क्र. 180 ते 184 मधील 154 एकर जमीन 15 वर्षांच्या कराराने सुभाष सामुदायिक या संस्थेला देण्याच्या ठरावाला मान्यता दिली होती. मात्र, यापुढील कराराची कार्यवाही पूर्ण न झाल्याने सद्य:स्थितीमध्ये या जमिनीवर सुभाष सामुदायिक संस्थेचा कोणताही मालकी अधिकार नाही.




तसेच, सहकारी संस्था शासकीय लेखापरीक्षक 9 यांनी 2024 मध्ये जलसंपदा विभागाला दिलेल्या पत्रानुसार सुभाष सामुदायिक संस्थेने त्यांच्या ताब्यातील जमीन बांधकाम व्यावसायिकांना हस्तांतरीत केल्याचे नमूद केले होते.

त्यामुळे ही जमीन ताब्यात घेण्यासाठी मान्यता द्यावी, अशी विनंती जलसंपदा विभागाच्या कार्यकारी अभियंता श्वेता कुऱ्हाडे यांनी महामंडळाकडे केली होती. कुऱ्हाडे यांनी या जमिनीच्या नोंदणीबाबत नोंदणी व मुद्रांक शुल्क महानिरीक्षकांनी पडताळणी करून त्याबाबत सविस्तर अहवाल विभागीय कार्यालयास देण्यात यावा.

तसेच, यामध्ये इतर खासगी बांधकाम व्यावसायिकांच्या नावे नोंदणी झाल्याचे आढळल्यास ही नोंदणी तत्काळ रद्द करण्यात यावी, अशी विनंती केली होती. दरम्यान, या जागेबाबत रितसर तक्रार देऊनही कोणतीही कारवाई होत नसल्याने मुंबई उच्च न्यायालयात जनहित याचिका दाखल केली होती.

कार्यकारी अभियंत्याच्या पत्रानुसार महामंडळाचे उपविभागीय अभियंता जी. एन. नाळे यांनी ही विनंती मान्य करत संबंधित जमीन ताब्यात घेण्याचे निर्देश दिले. ही जमीन शासकीय मालकीची असून, अतिक्रमण केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल, असा फलक लावण्यात यावा. तसेच, गेल्या 10 वर्षांत संघाने जमिनीचा वापर केल्याने रेडीरेकनर आणि रेपो दराने महसूल विभागाच्या नियमांनुसार भाडेपट्ट्याची रक्कम वसूल करावी, असेही सुचवले आहे.